# BDC LIBRARY

## New Paper Clipping

## A.Y. 2023-202



बाळासाहेब देसाई महाविद्यालयास करिअर कट्टा पुरस्काराने गौरविले. यावेळी प्राचार्य डॉ. शिरीष पवार, प्रा. श्रीनिवास गायकवाड उपस्थित होते.

# देसाई महाविद्यालयाचा करिअर कट्टा पुरस्काराने सन्मान

लोकमत न्युज नेटवर्क

पाटण : 'राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने 'करिअर कट्टा' उपक्रमांतर्गत वर्षभरातील उपक्रमाबद्दल शिवाजी विद्यापीठाकडून येथील कोयना एज्युकेशन सोसायटी संचालित बाळासाहेब देसाई कॉलेजला चार पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

बाळासाहेब देसाई कॉलेजला सातारा विभागात उत्कृष्ट जिल्हास्तरीय महाविद्यालयात द्वितीय क्रमांक मिळाला, जिल्हास्तरीय उत्कृष्ट प्राचार्य डॉ. एस. डी. पवार यांना पुरस्कार मिळाला. उत्कृष्ट जिल्हास्तरीय तालुका समन्वयक प्रा. श्रीगणेश गायकवाड, उत्कृष्ट जिल्हास्तरीय महाविद्यालयीन समन्वयक म्हणून प्रा. विशाल कांबळे प्रथम क्रमांक प्राप्त झाला आहे. डॉ. संदीप तडाखे यांची जिल्हा करिअर कट्टा जिल्हा समन्वयक म्हणून निवड झाली आहे. पुरस्काराबद्दल विक्रमसिंह पाटणकर, सत्यजितसिंह पाटणकर यांनी कौतूक केले. (वा.प्र.)